शिक्षण विभाग )प्राथ(पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन
शिवाजीनगर पुणे ४११००५
जा.क्र.खाप्राशा/२७६
दिनांक: ०९/०४/२०२५

प्रति,

अध्यक्ष/सचिव डेक्कन एज्युकेशन सोसायटी,
संचालित न्यू इंग्लिश मेडियम स्कूल(एन.इ.एम.एस.)
शनिवार पेठ पुणे-४११०३०.

विषय- डेक्कन एज्युकेशन सोसायटी, संचालित न्यू इंग्लिश मेडियम स्कूल(एन.इ.एम.एस.)
शनिवार पेठ पुणे

संदर्भ – १. शालेयक्रीडा शिक्षण व क्रीडा विभाग,शासन क्र.यशास्थ-३३२१/प्र.क्र.४८७/एसएम-१ दि.०६/१०/२०२३ शासन निर्णय.
२.प्राथमिक शिक्षण विभाग आ.क्र.१०३९९ दि.१३/०९/२०२४ चे पत्र प्राप्त दि.२३/०९/२०२४.

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की संदर्भिय.क्र.१ चे शासन निर्णय दि ६/१०/२०२३ अन्वये डेक्कन एज्यूकेशन सोसायटी पुणे संचलित न्यु इंग्लिश मिडीयम स्कूल सदाशिव पेठ पुणे या इंग्रजी माध्यमाच्या स्वयंअर्थ सहाय्यित शाळेस ३३८ते ३४१ शनिवार पेठ पुणे येथील स्थलांतरास कार्योत्तर मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात आलेली आहे.

१. स्थलांतरीत शाळेची किमान पट संख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही तसेच इच्छुक विदयार्थ्यांना स्थलांतराच्या ठिकाणी सामावू घेणे आवश्यक राहील.
२. सदर शाळा इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील
३. शासनाकडून शाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतन वेतनेवर अनुदानख विदयार्थी इ संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम आदेश इ चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.
४. शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्ती मध्ये बदल होणार नाहीत.
५. भविष्यात शासन मान्यतेशिवाय शाळेचे स्थलांतर करण्यात येणार नाही याबाबत संस्थेने दक्षता घ्यावी.
६. सदर स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी या आक्षेप आल्यास किंवा स्थलातरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलातर रदद करण्याचे अधिकार शासनास राहतील.

शाळेने इ.१ ते ४ थीची मान्यता कागदपत्रे सादर केलेली असल्याने सदर स्थलांतर कार्योत्तर मान्यता १ ते ४ थी साठी अंमलबजावणी करण्यात यावी.शाळेने इ ५ वी ते ७ वीचे वर्ग मान्यता आदेश सादर नसल्याने त्याबाबतीत वर्ग मान्यता आदेश सादर करावेत तद्नंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(सुनंदा वाखारे)
प्रशासकीय अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग
पुणे महानगरपालिका

NEMSS
Inward No. 5125-26
Date 09/04/2025

Head Master
New English Medium
Primary School
338, Shaniwar Peth. Pune-30